Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 307 – 312
DOI: 10.5281/zenodo.10125374

Original Research Article

# महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना : एक विश्लेषण

प्रा. डॉ. किशन बाभुळगावकर

प्रोफेसर, अर्थशास्त्र विभाग, श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय वसमत जि. हिंगोली ४३१५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: kishanbabhulgaonkar@gmal.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी हे एक केवळ व्यक्ती नसून तो एक विचार प्रवाह आहे. विचाराने प्रभावित होऊन जगात अनेक देशात अनेक व्यक्ती, शासन, संस्था, संघटना कार्य करताना दिसून येत आहेत. गांधी विचार भारताने जगाला दिलेले मोठी वास्तववादी तत्त्व आहे. त्यापूर्वीही भारताने जगाला बुद्ध तत्त्वज्ञान दिले होते पण गांधी तत्त्वज्ञान असो का बुद्ध तत्त्वज्ञान असो, हे विचार संपूर्ण जगाने बऱ्यापैकी आत्मसात करून सामाजिक आणि आत्मिक कल्याण केले पण भारतामध्ये अजूनही खऱ्या अर्थाने या दोन्ही तत्त्वज्ञानाचे समर्पण स्वीकारले नाही. महात्मा गांधीजींनी धर्म, नीती, राजकारण, शिक्षण, अर्थकारण, समाजकारण, उद्योग-शेती, न्यायव्यवस्था, आरोग्य अशा अनेक क्षेत्रात आपल्या विचारातून एक नवा आदर्शवाद जगासाठी घालून दिलेला दिसून येतो. या सगळया क्षेत्राशी संबंधित त्यांची एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे ग्रामस्वराज्य ही होय. खऱ्या अर्थाने ग्राम स्वराज्य संकल्पनेचा स्वीकार भारताने केला तर भारतातील कोणतेही क्षेत्र मागास राहणार नाही, याची कल्पना अनेक विचारवंतांना आहे. आज देशातील ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळलेली दिसून येते. एका बाजूने भारतीय अर्थव्यवस्था जगामध्ये पाचव्या स्थानी पोहोचलेली दिसून येते पण त्याचबरोबर भारतात दारिद्र्य, बेकारी, भ्रष्टाचार, शहरीकरणाच्या समस्या, टोकाचा भौतिक वाद आणि भांडवलवाद, शेतकरी आत्महत्या, आशा अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. या सर्व समस्यांवर महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य ही संकल्पना उपयोगी पडेल काय? या ध्येयाने प्रेरित होऊन संशोधनासाठी महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य ही संकल्पना निवडली आहे. महात्मा गांधीजींनी ज्या काळात ही संकल्पना मांडली होती त्यापेक्षा आजच्या 21 व्या शतकातील भारताच्या उत्थानासाठी त्यांच्या या संकल्पनेची भारताला आणि जगाला किती आवश्यकता आहे याचे चिंतन करण्याचे कार्य या लेखाद्वारे केले आहे.

**महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्य संकल्पना**

महात्मा गांधी हे केवळ पुस्तक रुपी संकल्पना मांडणारे विचारवंत नव्हते तर विचारांना त्यांनी कृतीतून जोड दिलेली आहे. महात्मा गांधीजींनी देशातील खेड्यांना भारताचा आत्मा मानले होते. त्यांच्या मते, ग्रामीण भागात उत्तम, आत्मनिर्भर आणि आदर्शवादी पंचायत राज निर्माण होणे गरजेचे आहे की ज्यामुळे संपूर्ण ग्रामीण भारत योग्यरित्या विकसित होऊन पूर्ण भारत देश कल्याणकारी होईल.

महात्मा गांधीजींच्या मते, ब्रिटिशांच्या हातून सत्तेचे हस्तांतरण भारतीयांच्या हातात होणे म्हणजे स्वराज्य असा त्याचा मर्यादित अर्थ घेणे योग्य होणार नाही, ब्रिटिश देश सोडून गेल्यानंतर खऱ्या अर्थाने देशाला स्वराज्य आणि स्वातंत्र्य निर्माण करून द्यायचे असेल तर देशात जात व धर्म विरहित समाज, देशातील सर्वांना समान संधी आणि समानता उपलब्ध करून देणारे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक वातावरण तयार होणे गरजेचे आहे, त्यासाठी त्यांनी ग्रामस्वराज्य ही संकल्पना प्रकर्षाने राबविण्याची गरज व्यतीत केली.

ग्रामस्वराज्य या संकल्पनेतून असे स्पष्ट होत आहे की, मानवाची अंतिम उद्दिष्ट हे त्यांचा बौद्धिक आणि नैतिक विकास होणे. त्यासाठी देशात आर्थिक विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे, असे गांधीजींचे चिंतन होते.

महात्मा गांधीजींनी धर्माचा आधार घेऊन सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे हे धर्माचे आद्य कर्तव्य असते नव्हे तर ती नीतिमत्ता आहे त्यासाठी आजच्या कल्याणकारी अर्थशास्त्राला त्यांच्या ग्रामस्वराज्यातील नैतिक मूल्याचे अधिष्ठान आहे.

महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेला त्यांची विश्वस्त ही संकल्पना पूरक आहे त्यांच्या मते एखाद्या व्यक्तीजवळ अधिकची साधनसामुग्री असेल तर ती व्यक्ती केवळ तिचे संरक्षण करण्याचे काम करत असते पण ती संपत्ती, तो पैसा हा समाजाचा आहे हा विचार धनवान व्यक्तीने करणे गरजेचे आहे, तरच समाज हित होते, नव्हे तर आजची भ्रष्टाचारासारखी समस्या निर्माणच होऊ शकत नाही,

महात्मा गांधीजींच्या मते, देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे, म्हणून ग्रामीण भागातून लघु आणि कुटीर उद्योग सुरू होणे गरजेची आहे. त्यासाठी त्यांनी ग्रामस्वराज्याची अंमलबजावणी आवश्यक आहे असे म्हटले.

महात्मा गांधीजींना ग्रामस्वराज्यामध्ये स्वदेशी ही बाब अपेक्षित आहे. त्यांना स्वदेशी स्वीकारताना ज्ञानेश्वराचे पसायदान तितकेच मान्य आहे पण स्वदेशी तुन स्थानिक साधनांच्या साह्याने उत्पादन करणे आणि वाढत्या भौतिक वादापासून दूर राहणे अपेक्षित होते.

महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्यात स्वालंबन अपेक्षित आहे, त्यांच्या मते प्रत्येक खेडे आर्थिक सामाजिक दृष्ट्या स्वयंपूर्ण असायला पाहिजेत. यांच्या गरजा गावातच पूर्ण झाल्या पाहिजेत. त्यांना चरितार्थासाठी दुसऱ्या गावावर किंवा शहरावर अवलंबून राहावे लागू नये ही अपेक्षा होती.

गांधीजींना स्वयंशासन ही बाब सुद्धा ग्रामस्वराज्यात अपेक्षित आहे. गावातील लोकांनी कल्याणासाठी सर्वांनी एकत्र बसून निर्णय घ्यावेत गावाच्या हितासाठी सर्व समावेशक स्थानिक कायदे निर्माण करावीत की ज्यामुळे सर्व गावकऱ्यांना आनंदी आणि तणावमुक्त जीवन जगता येईल.

गावातील ग्रामपंचायत मध्ये स्त्री-पुरुष सर्वांना समान प्रतिनिधित्व असावे, गावातील कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होणार नाही अशा पद्धतीने ग्रामस्वराज्य अपेक्षित आहे. या ग्रामस्वराज्यामध्ये आजच्या सारखी दंड किंवा शासन करण्याची पद्धत असणार नाही तर यामध्ये गुन्हा करणाऱ्या व्यक्तींना नैतिक समजावणे देऊन त्यांचे मत परिवर्तन अपेक्षित आहे.

महात्मा गांधीजींना ग्रामस्वराज्यात शिक्षणाचे महत्व अधोरेखित करताना शिक्षण हे केवळ लिहिता वाचणे येणे एवढे अपेक्षित नाही तर शिक्षणातून व्यक्ती नैतिक अधिष्ठान प्राप्त झालेला आणि स्वतःची रोजगार क्षमता वाढविणारा असावा अशी त्यांची अपेक्षा दिसून येते. त्यासाठी ग्रामीण भागातून हस्तो उद्योगाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने शिक्षण देण्यात यावे, हे शिक्षण मातृभाषेतून देण्यात यावे. शिक्षण हे मातृभाषेतून, विनामूल्य आणि सक्तीचे असावे, असे अपेक्षित होते.

त्यांच्या ग्राम स्वराज्यातील संकल्पनेत श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणारे शिक्षण अपेक्षित आहे. शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीने श्रमाला प्रतिष्ठा मिळवून द्यावी ही अपेक्षा अधोरेखित होते. पण त्याचबरोबर त्यांना यंत्रावर काम करणारा श्रमिक अपेक्षित नाही तर श्रमिका मध्ये वैचारिक आणि नैतिक अधिष्ठान असणारा देशाचा नागरिक असावा अशी अपेक्षा व्यक्त केलेली दिसून येते.

महात्मा गांधीजींना ग्रामस्वराज्यामध्ये प्रत्येक गाव सामाजिक दृष्ट्या निरोगी असावेत, असे वाटते. त्यांच्या दृष्टीने अस्पृश्यता मानवी समाजाला लागलेली कीड आहे, त्यामुळे भारतीय समाजांचे मोठे नुकसान झालेले आहे. ईश्वरांनी प्रत्येक व्यक्तीला समानता दिलेली आहे ही समानता मानवाने नष्ट केली, अशी कृत्य ईश्वराला मान्य होत नाही. त्यांना आदर्श खेडे यामध्ये अस्पृशता मान्य नाही.

ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करण्यासाठी ग्रामीण भागातून लघु आणि कुटीर उद्योगाची निर्मिती करण्यात यावी, त्यासाठी कापड उद्योगांना गावातून प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांनी चरखा उद्योगांना प्रोत्साहन दिले. गावातील लोकांना रोजगार मिळेल, लोकांना कापड मिळेल, गावातील पैसा गावातच राहील आणि त्यातून गाव समृद्ध होतील. एक एक गाव समृद्ध झाली की ग्रामीण अर्थव्यवस्था समृद्ध होईल त्यातून भारत देश विकसित होऊ शकेल अशी आशा महात्मा गांधीजींना होती. प्रत्येक गावात खादी, फळे, अन्नधान्य अशा पदार्थांची नियोजन करून उत्पादने घेण्यात यावीत. ग्रामीण भागातील उत्पादनाची वितरण व्यवस्था ही न्याय असली पाहिजे जेणेकरून कुठलाही व्यक्ती - समाज न्याय हक्कापासून वंचित राहणार नाही.

महात्मा गांधीजींच्या मते, ग्रामस्वराज्य प्रत्यक्षात ग्रामीण भागातून रुजण्यासाठी सहकारी शेतीचा अवलंब करण्यात यावा, ज्यामुळे गावातील गरीब शेतकरी एकत्र येतील, एकत्रितपणे विचारांची देवाण-घेवाण करतील, एकत्रित शेती करतील परिणामी त्यांची "एकमेका सहाय्य करू अवघी धरू सुपंथ" या उक्ती प्रमाणे सहजीवन निकोप सुरू होतील.

थोडक्यात, महात्मा गांधीजींनी स्वराज्याची संकल्पना मांडताना खेड्या -गावांमध्ये समाजाला चांगल्या दर्जाचे जीवन जगता आली पाहिजे अशी भूमिका मांडली. गावातल्या तरुणांना गावातच रोजगार मिळाला पाहिजे, गावातील तरुण हा शिक्षित आणि नितीन झाला पाहिजे, गावातील वातावरण सामाजिक दृष्ट्या सदोष असले पाहिजे म्हणजे गावात गटागटात वाद असू नयेत, श्रेष्ठ - कनिष्ठता म्हणजे अस्पृश्यता असू नये, गावातल्या साधन संपत्तीचा योग्य वापर करण्यात यावा की ज्यामुळे साधन संपत्तीचा नाश होणार नाही, गावातील लोकांना गरजा पूर्ण करण्यासाठी शहरावर

अवलंबून राहावे लागणार नाही, अशा सर्व दृष्टीने ग्रामीण भाग परिपूर्ण असावा अशी अपेक्षा गांधीजींनी त्यांच्या ग्रामस्वराज्य या सामाजिक आणि आर्थिक संकल्पनेत केली आहे. ही संकल्पना त्यांनी 1909 मध्ये हिंद स्वराज्य या विश्लेषणात्मक निबंधात प्रामुख्याने मांडलेली आहे.

गांधीजींच्या मते ब्रिटिशांच्या राजकीय स्वातंत्र्यापेक्षा ग्रामस्वराज्य ही संकल्पना अधिक सखोल आहे यामध्ये व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार आणि प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी असे संबंध निर्माण करील की त्या व्यक्तीच्या मनाला आणि शरीराला दुःख देणार नाही.

**ग्रामस्वराज्य संकल्पनेची आजची आवश्यकता**

महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना उदात्त अशी आहे. त्यांची ही संकल्पना आज सुद्धा भारताला आणि जगाला आवश्यक आहे. काही उथळ विचारांची लोक महात्मा गांधीजींच्या विचाराला दोष देतात. पण त्यांच्या विचाराशिवाय मानव जातीला चांगले आणि योग्य जीवन जगणे अशक्य आहे.

आज भारतात शहरीकरणाच्या नावाने विकास होताना दिसून येतो पण भारतीय खेडे बकाल होतं आहेत. भारतीय शेतकऱ्यांवर केंद्राचे व राज्याची कायदे लादली जात आहेत. परिणाम ग्रामीण भागाची अवस्था दयनीय झालेली दिसून येते. शेतकऱ्यांच्या मालाच्या किमती नियंत्रित करण्याचे काम वेळोवेळी शासन करीत असतात पण शेतकऱ्यांना शेतमालासाठी दिलेल्या हमीभावाच्या संरक्षणासाठी कोणतीही अंमलबजावणी दिसून येत नाही. जून-जुलै 2023 मध्ये टोमॅटोच्या किमती सरासरी 150 रुपये प्रति किलो होत्या तेव्हा नेपाळ सारख्या देशातून टोमॅटो आयात करून किंमत पातळी पन्नास रुपये स्थिर ठेवली पण पुढच्या सप्टेंबर 2023 मध्ये टोमॅटोच्या किमती पाच रुपये किलो झाल्या पण त्यासाठी सरकारने कोणतीही नियोजन केलेले दिसून येत नव्हते याचा फटका ग्रामीण शेतकऱ्यांवर पडला. अशी स्थिती प्रत्येक उत्पादनाच्या बाबतीत दिसून येते म्हणून भारतीय शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागतात.

आजही ग्रामीण भागातून मुलांना बुनियादी शिक्षण दिले जात नाही त्यातून ग्रामीण भागातील तरुण बेकार झालेला आहे परिणामी गांधीजींची ग्राम स्वराज्य संकल्पना कुठेही दिसून येत नसल्यामुळे भारतातील 50 टक्के भाग असलेला ग्रामीण समाज दारिद्र्यात दिसून येतो.

महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्यात सर्व समावेशक विकास अपेक्षित होता, पण आज भांडवलशाहीच्या युगात समाविष्ट करून घेणारा विकास दिसून येत नाही. परिणामी एकीकडे देशाचा जीडीपी वाढत असताना दुसरीकडे देशाची गरीबी वाढताना दिसून येते.

आज खेड्याची स्वावलंबनता नष्ट झालेली दिसून येते, उपभोगाला लागणारी प्रत्येक वस्तू खेड्यातला व्यक्ती हा शहरातून आयात करत आहे, म्हणून खेड्यांना पूर्वीचे वैभव राहिलेली दिसून येत नाही.

आजही खेड्यातून सामुदायिक - सहकारी शेती चा प्रयोग होताना दिसून येत नाहीत त्यातून सहकार्याची सहजीवन पद्धती दिसून येत नाही परिणामी ग्रामीण भागातून एकमेकांशी कुटताची भावना वाढीस लागलेली आहे.

गांधीजींनी ग्राम स्वच्छतेची भूमिका मांडली पण आजही ग्रामीण भागातून स्वच्छतेच्या सुविधा याची उपलब्धता आणि वापर होताना दिसून येत नाही. परिणामी ग्रामीण भागातून अनेक आजाराच्या साथी निर्माण होऊन ग्रामीण आरोग्य धोक्यात आलेली आहेत.

गांधीजींनी ग्रामस्वराज्यामध्ये विश्वस्त या बाबीचा अंतर्भाव केलेला आहे. एखाद्या व्यक्तीकडे असलेली आगाऊ ची संपत्ती त्याची नसून तो त्याचा विश्वस्त म्हणून काम करील पण आज मानव समाज इतका स्वार्थी झालेला आहे की आपण

मिळवलेली संपत्ती ही स्वार्थासाठी वापरत आहे पण इतर व्यक्तीला उपासमार, दारिद्र्य, भिकारी, टंचाई मध्ये जीवन जगावे लागत आहे. त्यासाठी मानवाने आज गांधीजीच्या विचाराने प्रेरित होऊन नैतिकता अवलंबून आपल्या बाजूला राहणाऱ्या गरीब लोकांचा विचार करावा.

गांधीजींनी ग्रामस्वराज्य असे स्पष्ट केली की एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला शारीरिक आणि मानसिक दुखवू नये, गावातील प्रश्न एकत्र बसून सोडवावेत. पण आज जगामध्ये एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या जीवावर उठलेला दिसून येतो, एक देश दुसऱ्या देशावर आक्रमण करताना दिसतो उदाहरणार्थ रशिया- युक्रेन युद्ध, हमास - इजराइल युद्ध, हे सर्व प्रश्न सोडवायचे असतील तर गांधीजींच्या विचारांची गरज आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी आज शेतीला लागणारे अदाने शहरातून खरेदी करताना दिसून येतात, आदानाच्या किमती प्रचंड वाढलेल्या आहेत त्यातून उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ बसत नाही. पण गांधीजींनी सेंद्रिय शेतीचा आग्रह धरून गावातीलच साधन संपत्तीचा उपयोग करून शेती करावी असे अधोरेखित केलेले आहे. शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा गांधीजींच्या विचारांची कास धरून आपले आयुष्य सुधारायला हवे.

ग्रामीण भागातील गतवैभव प्राप्त करण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून लघु आणि कुटीर उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, साधन संपत्तीच्या केंद्रीकरणाऐवजी विकेंद्रीकरणाला प्राधान्य द्यावे म्हणजे गांधीजींच्या ग्रामस्वराज्येच्या संकल्पनेचा आपल्या आर्थिक नियोजनात समावेश करावा.

भारतातील केंद्र सरकारने ग्रामीण भागासाठी अनेक विकासाच्या योजना आणलेल्या दिसून येतात जसे विश्वकर्मा योजना, जनधन योजना, मुद्रा योजना, मनरेगा, ग्रामीण आवास योजना. पण या योजनाची अंमलबजावणी योग्यरीत्या झाल्याशिवाय ग्रामस्वराज्य वास्तवात येणार नाही, शासनाने या सर्व योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करून गांधीजींचा भारत वास्तवात उतरावा.

आज गांधीजींच्या ग्रामस्वराज्यामध्ये पुढील बाबी समाज तो होणे आवश्यक आहे:

१. खेड्यातील सर्वांना पक्की घरे उपलब्ध झाली पाहिजे.
२. खेड्यामध्ये स्वच्छ पाण्याची सुविधा उपलब्ध झाली पाहिजे.
३. खेड्यामध्ये व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण करणे गरजेचे आहे.
४. खेड्यामध्ये बगीचे, समाज मंदिरे उभारने आवश्यक आहे.
५. खेड्यातून कृषी पर्यटनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत.
६. खेड्यातील तंटे गावातच परस्पर विचारविनिमयातून सुटणे गरजेचे आहे.
७. गावाच्या परिक्षेत्रातील साधन संपत्ती वर त्या गावातील सर्वांचा अधिकारा असावा.
८. गावाच्या ग्राम सभेत स्त्री-पुरुषाला समान अधिकार असावेत.
९. गावातील कला- संस्कृती, टिकून ठेवणे गरजेचे आहे.

थोडक्यात महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची संकल्पना जीवनाच्या प्रत्येक पातळीवर आवश्यक आहे, शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण प्रतिनिधी, शासन, प्रशासन सर्वांनी आपापल्या परीने ग्रामीण जीवन आदर्शवादी करण्यासाठी प्रयत्न करावा. खऱ्या अर्थाने ग्राम स्वराज्य स्वीकारले तर भांडवलशाहीतील समस्या, भौतिक वादातील समस्या आणि

वैयक्तिक व सामाजिक पातळीवरील उद्भवणाऱ्या नैतिकतेच्या समस्या उद्भवणार नाहीत तसेच खऱ्या अर्थाने मानव जीवन आनंदी, कल्याणकारी आणि समृद्ध होईल.

**संदर्भ ग्रंथ**


१. संशोधन पद्धती – भांडारकर
२. सत्याचे प्रयोग- मोहनदास करमचंद गांधी
३. ग्रामस्वराज्य - महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधीभवन पुणे
४. हिंद स्वराज्य मार्गदर्शक दस्तावेज - गंगाप्रसादजी अग्रवाल
५. गांधीजी दर्शन मीमांसा- सिंह, रामजी
६. आर्थिक विचारांचा इतिहास- प्रा. रायखेलकर.
७. आर्थिक विचारांचा इतिहास- डॉ. इंगळे
८. विविध वर्तमानपत्रातील लेख, संपादकीय लेख